गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

वर्ष २ रे | अंक ११ वा | मंगळवार २८ मे २०२४ | पाने ४ | किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 11 | Date : 28/05/2024 blow Tuesday Page 4 Price 4



## दहावी चा निकाल लागताच विद्यार्थ्यांनी केला जल्लोष

आज दहावीचा निकाल पाहताना पंढरपूर मधील विध्यार्थ्यांनी निकाल पाहण्यासाठी आयआयटी कम्प्युटर मध्ये खूप गर्दी केली,सर्व विद्यार्थ्यांना निकाल पाहण्यासाठी मोफत सोय केली होती. तसेच सर्वांना निकालाची प्रिंट पण मोफत काढून देण्यात आली. निकाल लागल्या नंतर विद्यार्थ्यांनी आनंदोत्सव साजरा केला.

# राज्याचा दहावीचा निकाल ९५.८१ टक्के

मुंबई : महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे (राज्य मंडळ) घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला. यंदा दहावीचा निकाल ९५.८१ टक्के लागला आहे. कोकण विभागाने निकालाने बाजी मारली असून, कोकण विभागाचा निकाल सर्वाधिक ९९.०१ टक्के लागला. तर नागपूर विभागाचा निकाल सर्वांत कमी ९४.७३ टक्के लागला. राज्य मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी पत्रकार परिषदेत निकाल जाहीर केला. मंडळाच्या सचिव अनुराधा ओक, सहसचिव माणिक बांगर या वेळी उपस्थित होते. यंदा दहावीच्या परीक्षेला विद्यार्थी नोंदणी वाढली होती. नऊ विभागीय मंडळांमार्फत ही परीक्षा घेण्यात आली. एकूण १६ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी या परीक्षेसाठी नोंदणी केली होती. निकालात मुलांपेक्षा मुलींच्या उत्तीर्णतेचे प्रमाण जास्त आहे. ९४.५६ टक्के मुले उत्तीर्ण झाली असून, ९७ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या आहेत. गेल्यावर्षी ९३.८३ टक्के निकाल लागला होता. गेल्यावर्षी राज्यातील १०८ विद्यार्थ्यांना शंभर टक्के गुण मिळाले होते.

राज्य मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी म्हणाले, की यंदा परीक्षा निकोप वातावरणात पार पाडण्यासाठी कॉपीमुक्त अभियान राबवण्यात आले. त्यासाठी २७१ भरारी पथके, महिलांची विशेष पथके नियुक्त करण्यात आली होती. त्याशिवाय जिल्हा स्तरावर स्वतंत्र पथके नियुक्त करण्यात आली होती. आठ माध्यमांत ही परीक्षा घेण्यात आली. प्रात्यक्षिक परीक्षांचे गुण ऑनलाइन घेण्यात आल्याने निकाल लवकर जाहीर करण्यास मदत झाली.

## जिल्ह्याचा दहावीचा निकाल ९५.२५ टक्के

सोलापूर/प्रतिनिधीः महाराष्ट्र राज्य माध्यमिक मंडळातर्फे मार्च २०२४ मध्ये घेतलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल सोमवारी ऑनलाईन जाहीर केला आहे. या निकालात सोलापूर जिल्ह्याचा निकाल ९५.२५ टक्के इतका लागला आहे. सोलापूर जिल्ह्यात ३५ हजार ५१५ मुले व ३० हजार १५६ मुली अशा एकूण ६५ हजार ६७१ विद्यार्थ्यांनी दहावीची परीक्षा दिली. त्यातून ३३ हजार ३१५ मुले (९३.८ टक्के) व २९ हजार २३७ मुली (९६.९५ टक्के) असे एकूण ६२ हजार ५५२ विद्यार्थी (९५.२५ टक्के) उत्तीर्ण झाले.जिल्ह्यात इयत्ता ११ वी प्रवेशासाठी विज्ञान शाखा ३२ हजार , कला शाखा १७ हजार तर वाणिज्य शाखा २३ हजार ५०० असे एकूण ७२ हजार ५०० विद्यार्थी प्रवेश क्षमता असल्याची माहिती माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी दिली आहे.

# आ. समाधान आवताडे यांनी विविध गावांना भेटी देऊन नुकसानग्रस्त भागांची केली पाहणी



**मंगळवेढा/प्रतिनिधी :** पंढरपूर तालुक्यातील तावशी, एकलासपूर व अनवली तसेच मंगळवेढा तालुक्यातील खोमनाळ, भाळवणी, निंबोणी, खुपसंगी, मारापूर, अकोला, हाजापूर, पाटखळ या भागात झालेल्या अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्यामुळे झालेल्या शेतीच्या नुकसानाची पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांनी प्रशासकीय अधिकारी व पदाधिकारी यांना सोबत घेऊन पाहणी केली.

तालुक्यातील अवकाळी पाऊस व वादळीवाऱ्या मुळे शेतीचे फार नुकसान झाले तसेच घरावरील, शाळेवरील पत्रे वाऱ्यामुळे उडून गेले आहेत आज प्रत्यक्ष भेट देऊन येथील नुकसानाची पाहणी केली. यावेळी नुकसानग्रस्त शेतकरी बांधवांशी संवाद साधत, त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या आणि नुकसानाचा आढावा घेतला.या वादळामुळे व अवकाळी पावसामुळे अनेक भागात फळ बागांचे प्रचंड मोठे नुकसान झाले आहे. । **पान २ वर**

# मुंबई तुंबु नये म्हणून सुरू केलेल्या ब्रीमस्टोवेड प्रकल्पाचा आढावा घेणार : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

मुंबई तुंबू नये म्हणून २००५ साली मुंबई मनपा ने कोट्यावधी रूपये खर्चून सुरू केलेल्या महत्वपूर्ण ब्रिमस्टोवेड प्रकल्पाच्या कामाचा आढावा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला पाहिजे.आपण याबाबत लवकरच मुंबई मनपा आयुक्त आणि संबंधित अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक घेऊन ब्रिमस्टोवेड प्रकल्पाचा आढावा घेणार आहोत.तसेच मिठीनदीसह मुंबईतील सर्व नाले सफाईची कामे येत्या ३१ मे पर्यंत पूर्ण करावीत अशी सूचना रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय राज्यमंत्री ना. रामदास आठवलेंनी संबंधित मनपा अधिकाऱ्यांना केली.ना.रामदास



आठवलेंनी आज बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स येथील मिठी नदी सफाई कामाची पाहणी केली.यावेळी रिपाइं चे जिल्हा अध्यक्ष साधू कटके ;मनपा चे कार्यकारी अभियंता विठ्ठल जाधव आदी अनेक मान्यवर उपस्थित होते. मिठी नदी सफाई चे कॉन्ट्रॅक्ट ४२ कोटी रुपयांचे देण्यात आले आहे.मिठी नदीचे पात्र १८० मीटर रुंद आहे.मिठी नदीतून गाळ कचरा उपसण्याचे काम वेगाने सुरू आहे. मिठी नदी सफाई काम ९० टक्के पूर्ण झाले असून येत्या दि .३१ मे पर्यंत मिठी नदीचे सफाई काम पूर्ण होईल अशी माहिती संबंधित ठेकेदाराने यावेळी दिली. २६ जुलै २००५ रोजी मुंबईत महापूर आलेला होता.त्यात मुंबईत मोठी मनुष्यहानी झाली होती. मुंबईत जलप्रलय येण्यास येथील मिठी नदी आणि तुंबलेले नाले आणि प्लास्टिक कचरा ही कारणे पुढे आली.या संकटातून मुंबई मनपा ने धडा शिकून भविष्यात मुंबईत जलप्रलय होऊ नये मुंबई तूंबु नये म्हणून महत्वाकांक्षी ब्रिमस्टोवेड प्रकल्प मुंबईत सुरू करण्यात आला.या प्रकल्पाचे काम किती पूर्ण झाले याबाबत ची सर्व माहिती घेण्यासाठी आपण लवकरच मनपा आयुक्त आणि संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेणार असल्याचे ना. रामदास आठवले म्हणाले.

# अक्कलकोट वागदरी रोडवर सांगवी बु गावाजवळ भीषण अपघात

**शिरवळ/प्रतिनिधी:**

अक्कलकोट वागदरी रोडवर सांगवी बु गावाजवळ आज संध्याकाळी वॅगनर कार व टू व्हीलर याच्या मध्ये भीषण अपघात झाले असून टू व्हिलर वरील अपघातग्रस्त हे शिरवळ येथील बालाजी थोरात कृषी सहायक व शिरवळवाडी येथील सिद्धाराम शिरगांपुरे कृषी सहायक असे त्याचे नाव असल्याचे समजते कार मधील जखमी पुणे येथील रहिवासी असून उपचारा साठी सगळ्यांना अक्कलकोट येथे पाठवण्यात आले आहे





**बीड जिल्ह्याचे सुपुत्र,मंत्रालयातील जेष्ठ पत्रकार श्री चंदन शिरवाळे यांना दैनिक पुढारी वृत्तसमुहाने सहाय्यक संपादक (राजकीय) पदावर बढती दिली आहे.याबद्दल बीड येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी त्यांच्या सत्कार करून शुभेच्छा दिल्या.यावेळी पत्रकार संघाचे विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी, सेवानिवृत्त अधिकारी अशोक जावळे उपस्थित होते.**

# कार्यकर्ता हा पक्षाचा कणा आहे, त्याला जपलं पाहिजे : उपमुख्यमंत्री अजितदादा पवार

**मुंबई/विजय घनघाव**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची कार्यकारिणीची बैठक आज मुंबईतील गरवारे हॉल येथे पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार, राष्ट्रीय कार्याध्यक्ष मा. खा. प्रफुल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे, पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा अन्न व नागरी पुरवठा मंत्री ना. छगन भुजबळ यांच्यासह मान्यवर पदाधिकारी, आजी-माजी खासदार, आमदार, जिल्हाध्यक्ष, फ्रंटल सेलचे प्रमुख, आणि पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत संपन्न झाली.

उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रीय अध्यक्ष ना. अजितदादा पवार यांनी बैठकीस संबोधित केले. निवडणूक ही कार्यकर्त्यांची परीक्षा असते. निवडणुकीच्या विजयाचा कोणीही उन्माद करू नये तसचं पराभावाने खचूनही जाऊ नये. कार्यकर्ता हा पक्षाचा कणा असतो त्याला जपलं गेले पाहिजे असं म्हणत अजितदादांनी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे मनोधैर्य वाढवले. तसेच आता विधानसभा निवडणुकीला आपण सामोरे जाणार आहोत. त्यावर लक्ष्य केंद्रीत करून त्यानुसार पक्ष संघटनेची बांधणी करायची असल्याचे त्यांनी सांगितले.

येत्या १० जून रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा २५ वा वर्धापनदिन आहे. यानिमित्ताने प्रत्येक जिल्ह्यात विविध कार्यक्रम राबवविले जातील, असे अजितदादांनी सांगितले. अल्पसंख्याक समाजासाठी सर्वाधिक चांगले निर्णय हे महायुतीच्या सरकारच्या काळात घेतले आहेत. शिव-फुले-शाहू-आंबेडकरांची विचारधारा ही आपल्या पक्षाचा मूळ गाभा असून कितीही मोठी किंमत मोजावी लागली तरी आम्ही ही विचारधारा सोडणार नाही, असे अजितदादांनी आपली भूमिका स्पष्ट केली. पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष मा. खा. प्रफुल पटेल यांनी उपस्थितांना



मार्गदर्शन केले. येणारी विधानसभा निवडणूक आपणा सर्वांसाठी महत्त्वाची असून त्यावर आपण सर्वांनी लक्ष केंद्रीत केले पाहिजे असे प्रफुल पटेल म्हणाले. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा पक्षाचा राष्ट्रीय दर्जा आपल्याला परत मिळवायचा आहे आणि अजितदादांच्या नेतृत्वाखाली पक्षाचा विस्तार देशभरात करायचा असल्याचा निर्धार प्रफुल पटेलांनी केला. त्यासाठी सर्वांनी कामाला लागण्याचं आवाहन त्यांनी केलं.

या बैठकीस प्रदेशाध्यक्ष मा. खा. सुनिल तटकरे यांनी संबोधित केले. येत्या ४ जूनला एनडीएचं सरकार येईल. मा. अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली जो आम्ही सर्वांनी अभूतपूर्व निर्णय घेतला. त्यावर महाराष्ट्राची जनता १०० टक्के शिक्कामोर्तब करेल असा विश्र्वास प्रदेशाध्यक्षांनी व्यक्त केला. लोकसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान महाराष्ट्रात वैचारिक पातळी खालावलेली दिसली. मात्र, प्रचारादरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या नेत्यांनी किंवा कार्यकर्त्यांनी कोणाविषयी टीका टिपण्णी करताना मर्यादा ओलांडली नाही, याचा सुनिल तटकरे यांनी आवर्जून उल्लेख केला. स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांचे आपणच खरे वारसदार आहोत याचा अभिमान असल्याचं ते म्हणाले.

पुढे आम्हाला विधानसभेच्या निवडणुकीला सामोरे जायचे आहे त्या दृष्टीने आपल्याला आता संघटनात्मक बांधणी करायची आहे. एकच लक्ष्य विधानसभा क्षेत्र ही भूमिका घेऊन आजपासून सर्वांनी कामाला लागावे, असे आवाहन करत आपल्याला अपेक्षित असलेले यश निश्र्चितपणे मिळेल असा विश्र्वास तटकरे यांनी व्यक्त केला. पावसाळी अधिवेशनापूर्वी जिल्हास्तरावर विभागीय मेळावे घेणार असल्याचं त्यांनी सांगितले. तसेच १० जूनला पक्षाचा २५ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करणार असल्याचे ते म्हणाले.

यावेळी पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा अन्न व नागरी पुरवठा मंत्री ना. छगन भुजबळ यांनी उपस्थितांना संबोधित केले. विधानसभा निवडणुकीच्या तयारीला लागून त्यादृष्टीने पक्षाची संघटनात्मक बांधणी करण्यावर भर द्यावा आणि सर्वांनी विधानसभा निवडणुकीवर लक्ष केंद्रीत करावे असे आवाहन छगन भुजबळ यांनी केले.

यावेळी ज्येष्ठ नेते रामराजे नाईक निंबाळकर, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ, मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील, अन्न व औषध प्रशासन मंत्री धर्मरावबाबा आत्राम, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, महिला व बालविकास मंत्री आदितीताई तटकरे, प्रदेश सरचिटणीस तथा कोषाध्यक्ष शिवाजीराव गर्जे, मुंबई विभागीय अध्यक्ष समीर भुजबळ, युवक प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण, राष्ट्रीय सरचिटणीस अविनाश आदिक,। **पान २ वर**

## संपादकीय

### विचार करावा..

हिंदू-मुस्लीम वाद जगजाहीर आहे. मुळातच देशाला स्वातंत्र्य मिळताना मुस्लिमांसाठी पाकिस्तान व हिंदूसाठी भारत (हिंदुस्थान) हीच संकल्पना नजरेसमोर ठेवण्यात आली होती. स्वातंत्र्य मिळताना पाकिस्तानातून हिंदूंना कशा प्रकारे भारतात पाठविण्यात आले, ही दृश्ये पाहिल्यावर आजही अंगावर शहारे येतात. त्याचवेळी मुस्लीम पाकिस्तानात जात असताना गांधी-नेहरू यांना आलेल्या मुस्लिमांवरील प्रेमामुळे या देशात मुस्लीम राहिले आहेत. पाकिस्तानला निर्मितीच्या वेळी ५५ कोटी रुपये गांधी-नेहरूंच्या भूमिकेमुळे भारताकडून पाकला द्यावे लागले होते. १९४७ पासून २०१४ पर्यंत हिंदू बहुसंख्याक असतानाही या देशात काँग्रेस व इतर पक्षांमुळे हा देश कधी हिंदुस्थान झाला नाही आणि हिंदुत्वाचा उदो उदो राज्यकर्त्यांकडून फारसा झाला नाही. १९४७ ते २०१४ पर्यंत मुस्लीम व अन्य अल्पसंख्याकांचे लाड करण्यातच भाजप वगळता त्या त्या सत्ताधाऱ्यांनी धन्यता मानली. यामुळे मुस्लीम समाज अल्पसंख्याक असतानाही बहुसंख्य हिंदूवर डोळे वटारण्याचे धाडस दाखवत होता. जातीय दंगली या देशात घडत गेल्या. २०१४ नंतर या चित्रात बदल झाला. मोदी सरकारच्या काळात हिंदूंना खऱ्या अर्थाने या देशात सुरक्षितता प्राप्त झाली. धार्मिक जातीय दंगली थंडावल्या. याच काळात तब्बल पाचशे वर्षांनंतर हिंदूंच्या देशात रामलल्लाच्या मंदिराची अयोध्येत उभारणी झाली. मोदी सरकार नसते तर कधी एकेकाळी देशात रामराज्य आणणाऱ्या रामलल्लाला त्याच्याच जन्मभूमीत अयोध्येमध्ये निर्वासितासारखे राहण्याची वेळ आली असती. मोदी यांनी २०१७ साली आर्थिक सल्लागार परिषदेची स्थापना केली होती. या परिषदेने आता भारतातील धार्मिक लोकसंख्येनुसार एक अहवाल प्रसिध्द केला आहे. या अहवालामध्ये २०१५ साली हिंदूंचा लोकसंख्येतील वाटा ७८ टक्क्यांपर्यंत आला आहे. आजही घटण्याचे प्रमाण सुरूच आहे. स्वातंत्र्यापासून आजपर्यंत आपल्या भारत देशामध्ये हिंदूंच्या लोकसंख्येमध्ये ७.८ टक्क्यांची घसरण झाली आहे. हिंदूंच्या लोकसंख्येमध्ये घसरण होत असताना मुस्लीम, ख्रिश्चन व अन्य धर्मियांची लोकसंख्या मात्र वाढल्याचे दिसून येत आहे. त्यातही मुस्लिमांच्या लोकसंख्या वाढीचा आलेख वाढत आहे. त्यामुळे आता खऱ्या अर्थाने 'जागो हिंदू जागो' असा टाहो फोडण्याची वेळ आलेली आहे. हिंदूसह जैन आणि पारशी या धार्मिक गटाचीही लोकसंख्या कमी झाली आहे. भारतात बहुसंख्याक हिंदू भविष्यात अल्पसंख्याक ठरू नये यासाठी हिंदूंनी वेळीच जागे होऊन विचारमंथन करणे काळाची गरज आहे.

पान १ वरुन

### कार्यकर्ता हा पक्षाचा कणा आहे,

शिरूर लोकसभेचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील, धाराशिव लोकसभेच्या उमेदवार सौ. अर्चनाताई पाटील, माजी केंद्रीय मंत्री सुबोध मोहिते, आ. प्रकाश सोळंके, आ. दिलीप मोहिते, बाबाजानी दुर्राणी, आ. बबनराव शिंदे, आ. मनोहर चंद्रिकापुरे, आ. शेखर निकम, आ. बाबासाहेब पाटील, आ. बाळासाहेब आजबे, आ. इंद्रनील नाईक, आ. विक्रम काळे, आ. सुनिल शेळके, आ. मकरंद आबा पाटील, आ. दिपक चव्हाण, आ. देवेंद्र भुयार, आ. चेतन तुपे, आ. यशवंत माने, आ. नितिन पवार, आ. अण्णा बनसोडे, आ. राजेश पाटील, आ. किरण लहामटे, आ. राजू कारेमोरे, आ. दौलत दरोडा, आ. राजू नवघरे, आ. सरोज अहिरे, माजी आमदार रमेश थोरात, मुश्ताक अंतुले, विलास लांडे, आ. अनिकेत तटकरे, आनंद ठाकूर, दिपक आबा साळुंखे, कैलास पाटील, पंकज भुजबळ, अरविंद चव्हाण, मुख्य प्रवक्ते उमेश पाटील, राजलक्ष्मी भोसले, ठाणे जिल्हाध्यक्ष तथा प्रवक्ते आनंद परांजपे, अल्पसंख्याक सेलचे राज्य प्रमुख इद्रिस नायकवडी, सामाजिक न्याय विभागाचे राज्यप्रमुख सुनील मगरे, ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे आणि सर्व सेलचे प्रदेशाध्यक्ष, प्रदेश पदाधिकारी, महिला पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### आ. समाधान आवताडे यांनी विविध

त्याचबरोबर वादळामुळे संपूर्ण केळीबागांचे प्रचंड मोठे नुकसान झाले आहे. एकही खोड जिवंत राहिलेले नाही, केळीचे हे १०० टक्के नुकसान झालेले आहे.या पाहणी दरम्यान नुकसानग्रस्त शेतकर्यांना आमदार आवताडे यांनी धीर देत, प्रशासनाला तात्काळ पंचनामे करून लवकरात लवकर शेतकऱ्यांना मदत करण्याच्या सूचना दिल्या. या नागरिकांना शासनामार्फत शक्य तेवढी मदत मिळवून देण्यासाठी मी प्रयत्नशील असल्याचा विश्र्वास आमदार आवताडे यांनी यावेळी दिला.यावेळी जिल्हा नियोजन समिती सदस्य प्रदीप खांडेकर यांचेसह इतर मंडळी व संबंधित गावातील ग्रामपंचायत पदाधिकारी व स्थानिक ग्रामस्थ उपस्थित होते.

# 'रमाई' जिने सावली सारखी साथ दिली अन कठीण प्रसंगात त्यांचा उत्साह वाढविला

**रमाई, कोटी-कोटी प्रणाम!...**

खातो तो घास आणि घेतो तो श्र्वास हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कर्तृत्वामुळे आहे. अस्पृश्य समाजाच्या वाळवंटी जीवनांत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ही बाग फूलविली आहे. त्याचा आम्हाला सार्थ अभिमान वाटतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतःच्या परिश्रमाने, त्यागाने लढा देऊन आम्हाला अधिकार मिळवून दिले. त्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आम्ही लोक ऋणात आहोत. जन्मदाते आई वडील तर आमच्या जन्माचे साथीदार आहेतच, परंतु बाबासाहेब तर आमच्या कर्माचे साथीदार आहेत. प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या पाठीमागे एक स्त्री असते. असे म्हटलं जाते मग ती आई किंवा पत्नी असेल. कुळवाडी भुषण छत्रपती शिवाजी महाराजांच्या पाठीमागे त्यांच्या माँ जिजाऊ तर राष्ट्रपिता ज्योतीबा फूल्यासोबत सावित्रीबाई होत्या आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसोबत त्यांच्या अर्धांगिणी रमाई होत्या. अशी स्त्री जिने सावली सारखी साथ दिली. कठीण प्रसंगात त्यांचा उत्साह वाढविला त्यांना खचू दिल नाही.

माझ्या जीवनातील मायेचा ओलावा।।
मोजमापामध्ये कसा बरे तोलावा?।।
माझ्या शिक्षणासाठी हाल अपेष्टा सोसल्या।।
संसारासाठी तिने रात्री जागून काढल्या।।

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विवाह रमाशी भायखळ्याच्या भाजीमंडईत झाला. विवाह प्रसंगी बाबासाहेबाचे वय १४ वर्षे तर रमाईच वय ९ वर्षाच होते. विवाह संपन्न झाल्यानंतर आवराआवर सुरू असताना जोराचा पाऊस सुरू झाला. साहेब आणि रमा दोघेही एकाच छत्रीत उभे असताना पावसाने भिजले होते. फारशी ओळखपाळख नसल्यामुळे पावसानी जणू आपल्या धारांनी त्यांना एकत्र बांधलं असावं. ते परस्परांकडे बघत होते. रमा आता साहेबांची सहचारिणी झाली होती. ते संसाररुपी सागरात त्यांची नौका धैर्याने हाकलण्याचा प्रयत्न करीत होते.

बाबासाहेब रमाला रामू म्हणूनच हाक मारीत असत. रामू दिसायला सुंदर, सोज्वळ, सुस्वभावी व गुणी होती. अशा निर्मळ मनाच्या रामूसाठीच की काय पावसाच्या धारा जणू आईच्या वात्सल्याचं प्रतिक म्हणून बरसत होत्या. बाबासाहेब हे आईविना पोरके व रमाई ही सुद्धा पोरकी होती. दोघांची दुःखे सारखीच. एकाच नदीच्या पात्रातील ते दोन प्रवासी एकाच नावेत बसून पैलतीर गाठणार होते. तो प्रवास हा सहप्रवास होता. या सहप्रवासात त्यांनी परस्परांना समजून घेणे आवश्यक होते. बाबासाहेबांना तरी समजून घेणारे त्यांचे वडील होते. परंतु रामूला तर जवळच अस कुणी नव्हतच पण रामूच्या डोळ्यांतील आसवे त्यांना काही वेगळेच सांगत होती. आता तर मी तुमची झाली पण माझ्या बहीण भावाचे काय? अशा अनेक प्रश्र्नांचे काहूर तिच्या मनात घोळत होते. रमाचा स्वभाव शांत, सरळ व सुशील होता. प्रामाणिकपणा तर तिच्या अंगीच होता. तिच्या डोळ्यात चमक होती. ती अशिक्षीत होती पण सभ्य होती. विवाहानंतर नवी नवरी घरी आली. रामजी बाबांनी हाक मारली तिला 'रमा बेटा' म्हणून. भूतकाळात गेलेली रमा हाकेला ओ देऊन बाबांच्या समोर जाऊन बसली. रामजी बाबा सर्वांसमोर रमाला भीमराव विषयी सांगत होते. बेटा, हा अनमोल ठेवा तुझ्या स्वाधीन करीत आहे, त्याला तू जप. माझा तुझ्यावर अतुट विश्र्वास आहे. त्याला तू खूप मोठ कर, आधार दे असे म्हणताच रडू लागली. जवळच बसलेल्या मीराबाई रमाच्या पाठीवरून मायेचा हात फिरवीत होत्या. रडता रडताच रमाने डोळे पुसलेत. आणि म्हणाली मामंजी, आत्या मी एक अडाणी मुलगी आहे. मला काही कळत नाही. तुमचा आशिर्वाद द्या. चुकलंमाकलं तर सांभाळून घ्या. रमाच्या अशा शब्दांनी मन कुरतडल्यासारखं झालं. रमाचे नम्रपणे बोलणं ऐकून बाबासाहेब विरघळलेच. न शिकता सभ्यपणा रमामध्ये होता. याचे त्यांना खरच नवल वाटलं. एवढ्या कमी वयात एवढा समजूतदारपणा? रमा सकाळीच उठून घरातील कामे लवकरात लवकर आटोपून घेत असे. तिला कधीच कंटाळलेली, थकलेली कुणी



पाहिलेली नाही. रमाच्या जीवनाची गाठ एका वादळाशी बांधली गेली होती. ज्या प्रमाणे वादळाला शांतता माहित नसते त्याचप्रमाणे वादळाचा स्पर्श झालेल्या रमाला शांत बसणे किंवा थकणे हे तर माहितच नव्हते.

रमा जरी अशिक्षीत होती, तरी ती समजदार होती. रमानं पहिल पाऊल टाकताच वातावरण बदलून गेलं. मीरा आत्या तर रमाला लेकीप्रमाणे जीव लावीत हेती. रामजी बाबांच्या ओठी तर सतत रमा, रमा असे. लक्ष्मीबाई तर बहिणीप्रमाणे सोबत असे. सर्व घर रमामय होऊन गेले होते. ती कधी थकली तर कधी कंटाळलेली दिसली नाही. घरभर भिंगरी सारखी फिरत असे. रमाच्यारुपाने घरात जणू फूल बागच डोलत असे.

भिमरावांचा मॅट्रीकचा निकाल लागल्यावर ते पास झाल्याची बातमी गांवभर पसरली. घर आनंदात बहरून गेल होतं. या प्रसंगाची आठवण सांगताना बाबासाहेब लिहितात की, बाबांच्या आनंदाला पारावार राहिला नव्हता. सारी वडीलधारी मंडळी घरात बसली होती. आनंद काका, लक्ष्मीबाई, मिराबाई, सावत्रआई जिजाऊ, बाबा, रमा असे सर्व खुष होते. पण रमाचे काळीज आभाळाएवढ झाल होतं. नव-याचे कौतुक कसे करावे? हे तिला कळलं नव्हतं. रमा काही बोलली नाही परंतु तिचे डोळे खुप काही सांगत होते. अस्पृश्य समाजातील पहिला विद्यार्थी मॅट्रीक उत्तीर्ण झाल्याबद्दल केळुस्कर गुरुजींनी स्वलिखित बुद्धाचे चरीत्र भेट देऊन बाबासाहेबांचा सत्कार केला होता. तेव्हा बाबासाहेब रमाबाईस म्हणतात, रमा माझा सत्कार पाहून तुला काय वाटलं? सत्कार प्रसंगी रमाईच्या डोळ्यातून आनंदाश्रू वाहत होते. तिचे अश्रू जणू मोत्याप्रमाणे ओघळत होते. रमाच्या आनंदाला उधाण आले होते. मन आनंदाने बागडत होते. आनंदाचे भरतं, आल होत. ते पाहून बाबासाहेब गदगदले आणि म्हणाले, रामू तुझ्या सांगण्याने मी पास झालो. रमा तूं मला फक्त साथ दे. मी खुप शिकेन. तू आता तुफानाची सावली आहेस. तू पदराला वादळ बांधून निघालीस.

रमा अडाणी होती म्हणून बाबासाहेबांना वाटायचं आपण एवढे शिकत आहोत. पत्नी रमा अडाणी आहे. तिला शिकवले पाहिजे. बाबासाहेबांनी रमाईस शिकविण्याचा निश्र्चय केला. शिकविण्यास सुरूवात केली. या प्रसंगाची आठवण सांगताना बाबासाहेब म्हणाले की, पहिल्या दिवशी तर रमा हसतच होती. मला रमाचा खुप राग आला होता. परंतु शेवटी तिलाच शिक्षणाचे महत्त्व कळाले. ती जिद्दी असल्यामुळे घरातील कामे लवकरात लवकर आटोपून लिहिणे वाचणे करीत असे. मी शिकवायला लागलो की तिचे सारे लक्ष कामात असे. तिला थोडे लिहिता वाचता येऊ लागले. मी कॉलेजला गेलो की ती माझ्या खोलीत अस्ताव्यस्त पडलेली पुस्तके नीट व्यवस्थित लावून एखादे पुस्तक वाचायला घेत असे. रमाबाईच्या विवाहाला दोन वर्षे झालीत आणि त्यांच्या घरात बाळाची चाहूल लागताच त्यांचा सर्व घर आनंदून गेला. १९१२ सालात रमा आई झाल्यात आणि बाबासाहेबांना वडील होण्याचा आनंद झाला. आपल्या लाडक्या मुलाच नांव त्यांनी यशवंत ठेवले. यशवंत हा बाबांचा अतिशय लाडका. रमाई तर दिवस रात्र बाळाच्या आसपासच राहात असे. बाळामुळे त्यांच्या घरात आनंद ओसंडून वाहू लागला.

बाबा आपल्या सुनेस लय जीव लावीत. ते रमाला सुन नव्हे! तर मुलगीच समजत असत. रमा नित्याप्रमाणे सास-यांची सेवा करीत असे परंतु वडीलासमान रामजीचा सहवास जास्त काळ लाभला नाही. त्यांनी आपल्या आवडत्या पुत्रास व सुनेस सोडून या जगाचा निरोप घेतला परिणामी रमाई बेचैन झाल्या.

रामजी बाबांना जाऊन पाच सहा महिणे झाले असतील त्यांच्या मृत्यूनंतर बाबासाहेबांना अमेरिकेला जाण्याची संधी आली होती. त्यावेळी रमा दुस-यांदा गरोदर होत्या. पती दुरदेशी विलायतेला जात आहेत आणि येथे तर रामजी बाबांचं छत्र सुद्धा हरवलेले आहे. त्यामुळे रमाई अस्वस्थ झाल्या होत्या. पतीला निरोप देताना त्यांनी मोठ्या प्रयत्नाने आपल्या अश्रुंचा बांध आवरला होता. बाबासाहेब अमेरिकेत असताना दुसरा मुलगा झाला त्याचे नांव रमेश ठेवण्यात आले होते, तो वारला. एकट्या रमाने पोटच्या गोळयाचे दुःख पचवलं. रमान आपल्या पतीला पत्रात लिहिले की, आपल्या गैरहजेरीत रमेशने जगाचा निरोप घेतला. आपल्या अभ्यासात अडथळा येईल म्हणून उशिरा कळवीत आहे. किती ही पतीच्या शिक्षणाविषयी काळजी. पोटचं पोर वारलं तरी पतीला लवकर न कळविणारी पत्नी रमा ही जगावेगळीच. चार वर्षानंतर बाबासाहेब मायदेशी परत आले. चार वर्षे रमाने कसे बसे दिवस काढले. याच अवधीत इंदू नावाची मुलगी सोडून गेली होती. रमा हे सर्व सहन करीत कसेतरी दिवस काढत होती. एक एक दिवस पुढे ढकलत होती. दुःख तिचा पाठलाग करीत होते. तिचे काळीज दुभंगून जात होते. वेड्यासारखी तिची अवस्था झाली होती. चार लाडक्या लेकरांना स्वतःच्या हाताने मुठमाती दिली होती. कधी उपवासी राहून तर कधी गोव-या थापून तिने संसार चालविला होता. तरीही तिने कधीच आपल्या व्यथा पतीला सांगितल्या नाहीत. म्हणून एक कवी आपल्या कवितेत म्हणतोय, 'ग रमा, धन्य तू जन्मली बाहेर भीमासाठी, कधी उपासी तर कधी शिळी पाकी, फाटक्या लुगड्याला बांधल्या गाठी'. रमान संसारासाठी शेण गोळा करून गोव-या थापल्या. त्या विकून त्यांनी संसाराचा गाडा चालविला. कधी उपासी तर कधी शिळीपाकी भाकरी खात असे. लुगड्याला कितीतरी गाठी बांधल्या पण नवीन लुगड घेतले नाही. या रमाच्या कष्ट, दुःख आणि त्यागाला अंत राहिला नाही. याच अनुषंगाने बाबासाहेब म्हणतात की, मी जेव्हा बॅरिष्टर होऊन घरी येत होतो. तेव्हा रमाच्या लुगड्याला अनेक गाठी होत्या. बॅरिस्टरांची अर्धांगीणी म्हटल्यावर फाटक्या लुगड्यात स्वागतासाठी जाणे योग्य नाही. म्हणून रमानी शाहू महाराजांनी सत्कार समारंभात दिलेला जरिचा फेटा नेसून आली. माझं लक्ष रमाकडे होत. मला तो जरिचा फेटा आठवला. माझे अश्रू मला रोखू शकले नाहीत. माझे डोळे नकळत रमाने नेसलेल्या फेट्यावर टिपकत होते. म्हणून बाबासाहेब म्हणतात की, तुझ्या कष्टाचे चीज झाले. मी बॅरिस्टर होऊन आलो. तू माझ्यासाठी अपार कष्ट उपसलेस. तिलाही वाटे नव-याने आपल्या जवळ बसावं, बोलावं, संसाराच्या चार गोष्टी सांगाव्यात. रमाच्या संसाराच्या अपेक्षाच वेगळ्या होत्या. शेवटी ती कधी कधी कुरकुर करीत असे. परिणामी १९२० साली लंडनला जाताना रमाचं आणि बाबासाहेबांच खडाजंगी भांडण झाले. शेवटी माघार घेताना रमा म्हणाली की, वादळाला कितीही अंकीत केले तरीही ते जसे हाती येणार नसते, तसेच आपल आहे. हे रमाला कळून चुकलं की, वादळ मुठीत येणार नाही. आता वादळाला मोकळे सोडायला हवे. अशी जणू तिने प्रतिज्ञाच केली होती. रमाईला आपल्या पतीचा जन्म हा दिन दुबळ्या, वंचित अस्पृश्यांच्या कल्याणासाठीच झाला असल्याची जाणीव होती. म्हणून त्या पत्रात लिहितात की, साहेब आपण महान आहात. आपला समाज इतका दुबळा आहे. त्याच कल्याण तुमच्याच हातात आहे. अशाप्रकारे तिला संसाराची नव्हे! तर समाजाची चिंता लागली होती.

रमाईने चवदार तळयाच्या सत्याग्रहासाठी येण्याचा हट्ट पतीजवळ धरला होता. प्रकृती ठीक नसल्यामुळे बाबासाहेब त्यांना महाडला घेऊन गेले नाहीत. रमाई मात्र घरी रडत बसल्या. रमाई एक संवेदनशील स्त्री होत्या. कुणाचेही दुःख पाहून ती दुःखी होत असे. रमाईचे कार्य कर्तृत्व पाहून गायिका पुष्पा साळवे गितातून व्यक्त करतात,

उपासपोटी विद्यार्थ्यांची भूक जाणली नि तहान, अन्नासाठी रमाबाईन विकल कंगण।।धृ।।
धारवाडला वस्तीगृहात, नव्हतं अन्न त्या दिवशी, पैशावाचून मूले सगळी वस्तीगृहात उपाशी।। विकून सोनं आणिल धान्य, भाकर थापली रमानं, अन्नासाठी रमाबाईन विकलं कंगण।।

अशाप्रकारे प्रकृती ठीक नसल्यामुळे एकदा त्या धारवाडला गेल्या होत्या. तेथील वस्तीगृहातील मूले उपाशी बघून त्या अस्वस्थ झाल्यावर त्यांच्या जेवणाची व्यवस्था करण्यासाठी हातातील कंगणे विकली. रमा खूपच काटकसरीने संसाराचा गाडा चालवायची. कष्ट करायची तिला कमीपणा वाटत नव्हता. इतर स्त्रिया म्हणायच्या बॅरिस्टर साहेबांची बायको डोक्यावरुन शेणीच भारं आणते. एवढ्या मोठ्या नव-याची इज्जत धुळिला मिळविते. परंतु रमाने इतरांच्या बोलण्याकडे लक्ष दिले नाही. तिचा देवा धर्मांवर भारी विश्र्वास. पतीच्या जीवनांला काही धोका होऊ नये, म्हणून ती उपास तापास करीत असे.

राजरत्नाच्या मृत्यूनंतर रमाबाईची प्रकृती सतत बिघडत राहायची. १९३५ च्या जानेवारीत त्या फारच आजारी पडल्यावर चार महिणे अंथरूणावर खिळूनच होत्या. रमाई स्वतःच्या मृत्यूला घाबरत नव्हत्या. साहेबांच्या जीवाला काही धोका होऊ नये म्हणून तिचा जीव तिच्या डोळ्यात होता. पत्नीसाठी हळवे, विव्हळ झालेले बाबासाहेब रमाईचं डोकं मांडीवर घेऊन बसले. रमाईने आपला एक हात वर करून साहेबांच्या डोळ्यातून वाहणारे अश्रू पुसण्याचा निष्फळ प्रयत्न केला. पण त्यांचा तो हात खाडकन खाली गळून पडला. साहेबांची तेजपूंज मूर्ती हृदयात साठवून ठेवण्याचा प्रयत्न करीत असतानाच रमाईची नेत्रद्वारे खाडकन झाकली गेली आणि बाबासाहेबांनी एकवटून हंबरडा फोडला रा मू... रामू. पहाडासारखे बाबासाहेब एखाद्या वेलीसारखे उध्वस्त होऊन रमाईच्या अंगावर उन्मळून पडले. वेड्यासारखे ओरडू लागले रा मू ... साहेबांच्या धर्मपत्नी रमाईच्या दुःखद निधनाची वार्ता सा-या देशभर पसरली. संबंधित स्त्रिया, पुरूष, युवक, मूले यांची गर्दी झाली. प्रेतयात्रेची तयारी लोक करू लागलेत. यशवंत, हातात शिके घेऊन पुढे पुढे रडत रडत चालला होता.

पुढे यशवंत, जणू अश्रूंनी वाट दिसे ओली,
चालली रमाईची डोली।।
हिरवा पातळ, हिरवी चोळी, हिरवा चुडा सौभाग्य कपाळी।।
सतेज काया, नेत्र उघडे, काहीच ना बोली।
चालली रमाईची डोली।।

अशाप्रकारे ही रमाई म्हणजे मनाला अंतर्मुख आणि उन्नत करणारा अश्रूंचा लावण्यसोहळा. रमाई म्हणजे सभ्यतेची महामाता, दुःख, त्याग, प्रगाढ समजूतदारपणा, कारुण्य, उदंड मानवता, अथांग प्रज्ञान आणि मृत्यू यांचे सर्जनशील निर्माण म्हणजे रमाई. अंतर्मुखालाही खोल अंतर्मुख करणारी आणि उजेडाच्या वाटेवर सुगंध होऊन चालणारी सौंदर्य पौर्णिमा कारुण्यमूर्ति रमाई!... कोटी कोटी प्रणाम!

**लेखिका : यशोधरा बी. मेश्राम,**



**४ साकेतनगर, भावसिंगपुरा रोड, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र. ४३१००२**

**संपर्क:७५८८३५४७६५**

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# नळदुर्ग येथील जनसेवा बहुद्देशीय शिक्षण संस्थेच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**वागदरी/एस.के.गायकवाड**

जनसेवा बहुउद्देशीय शिक्षण संस्था नळदुर्ग ता.तुळजापूर व पैलवान रेवप्पा सोनकांबळे क्रीडा प्रतिष्ठान नळदुर्ग-पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित इ.१२ वी उत्तीर्ण व पदवी शिक्षण घेणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा पुणे येथे यथोचित सत्कार करण्यात आला. तथागत भगवान गौतम बुद्ध यांची १२८६ वी जयंती आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंती निमित्त इ.१२ वी उत्तीर्ण व पदवी पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या गुणवंत विद्यार्थी व विद्यार्थिनीचा सत्कार जनसेवा बहुउद्देशीय शिक्षण संस्था व पैलवान रेवाप्पा सोनकांबळे क्रीडा प्रतिष्ठान नळदुर्ग-पुणे याच्या संयुक्त विद्यमाने टिंगरे नगर पुणे येथील संघमित्रा प्रेरणा बुद्ध विहार बरमासेल येथे करण्यात आला.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महिला मंडळाच्या अध्यक्षा गोजरताई जेठीथोर ह्या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून परिवर्तन सामाजिक संस्था नळदुर्गचे सचिव मारुती बनसोडे हे होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते तथागत भगवान गौतम बुद्ध व महामानव डॉ बाबासाहेब बनसोडे यांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी कु.ऋतुजा संजय पवार,आराशीन शेख,सुजाता देविदास जाधव,पायल भारत जाधव,सागर जेठीथोर ,सुजीत विजय वंजारी ,ओम शालीक राठोड,आम्रपाली फुलमली,अश्रिवनी गिरी,अक्षदा देवता चलवादी, कावेरी एलप्पा चलवादी ,सोनाली चलवादी,भरती पवार,ऋतुजा पवार ,सुजय भिंगारदिवे,सागर निसर्गने,राजन निसर्गने,जानवी फुलमली,जणू फुलमली,गोरसे श्रीकांत, सिद्धांत सुखे,आदी विद्यार्थ्यांचा पुस्तक, वही व पेन देऊन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचलन प्रा.आर.आर. सोनकांबळे यांनी केले तर आभार प्रदर्शन स्वराज्य सोनकांबळे यांनी केले. यावेळी नवाडे सर ,सुरेखा विजय वंजारी (अंगणवाडी सेविका व आदर्श किशोरी पुरस्कार प्राप्त),फुलमली इंदूबाई,अरुणा कांगडे ,भिंगारदिवेबाई आदी उपास्थित होते.

# उत्सव मैत्रीचा माजी विद्यार्थ्यांचा गेट-टुगेदर २५ वर्षांनंतर उत्साहात साजरा

**बुलढाणा/राहुल साबळे**



चिखली तालुक्यातील मेरा चौकी येथील २००६ च्या बॅचच्या माजी विद्यार्थ्यांनी पुन्हा एकदा एकत्र येत जुन्या आठवणींना उजाळा दिला. तब्बल २४ते २५वर्षानंतर ८०माजी विद्यार्थ्यांचा गेट टुगेदर नुकताच पार पडला. या मेळाव्यात माजी विद्यार्थ्यांकडून शाळेला आर्थिक मदतीचा हात देण्याचा निर्णय घेण्यात आला.या कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने करण्यात आली. मागील काही काळात आणि व वर्ग मित्र यांना वाहण्यात आली. सुरुवातीला सर्वांची माहिती . तसेच यावेळी माजी विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी जोपासत शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना मदतीचा हात देण्याचा निर्णय घेतला.

**८० विद्यार्थ्यांचा सहभाग** येत्या काही दिवसांत श्री शिव शंकर विद्यालय भरोसा मेरा चौकी शाळेतील काही गरीब व होतकरू विध्यार्थाना सर्व प्रकारचे शालेय साहित्य आणि त्यांची शाळेची फी या बॅचकडून देण्यात येणार आहे. माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्यासाठी डॉक्टर दीपक भगत , पत्रकार अंकुश पाटील,दिपक पैठणे, भागवत नवले कृषी सहाय्यक, भरत सुर्वे, उमेश भगत, सोनू काळे प्रवीण जाधव विजय आडे परमेश्र्वर बहुले गोपाल काळे विकास राठोड कैलास भगत सिद्धेश्र्वर सोळंकी सतीश काळे अनिल उदार अमोल मिसाळ भागवत वाघमारे उमेश भगत नामदेव शिवतारे भागवत नवले नारायण तुटे निलेश काळे गजानन भुसारी राधा होळकर मीरा गाडेकर रेखा खरात सुनील शिंगणे रामेश्र्वर थुटटे मंगेश गाडेकर पुढाकार घेतला. या मेळाव्यात ८० माजी विद्यार्थी सहभागी झाले होते.

**गरजू विद्यार्थ्यांचे भरणार शुल्क**

शाळेतील माजी विद्यार्थी आज वेगवेगळ्या क्षेत्रात चांगल्या पदांवर कार्यरत आहेत. उद्योजक तर कुणी व्यवसायिक क्षेत्रात वेगळा ठसा उमटवला आहे. अशा माजी विद्यार्थ्यांकडून सामाजिक बांधिलकी जोपासत शाळेत प्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आर्थिक मदतीचा हात देण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला. शाळेतील गरजू विद्यार्थ्यांचे शुल्क, तसेच शैक्षणिक साहित्य वाटप केले जाणार आहे. यावेळी श्री शिव शंकर विद्यालय भरोसा विद्यालयाचे प्राचार्य श्री पडघान सर श्री लांडकर सर श्री शिरसाट श्री बंगाळे सर श्री सौभाग्य सर उबरहडे मॅडम तसेच सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते

## भारतीय बौद्ध महासभा शाखा करमाळा यांच्या वतीने

# दहावी सीबीसी पॅटर्न व बारावी उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव



**करमाळा/ प्रतिनिधी**


२६/ ५ /२०२४ रोजी गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला यामध्ये सी.बी.सी पॅटर्न मध्ये हर्षवर्धन विलास ओहोळ यांनी इयत्ता दहावी मध्ये ८२ टक्के गुण मिळवले कपिल किसन कांबळे बारावी सायन्स मध्ये यांनी ८६.३३ टक्के मिळवले तर नम्रता भगवान थोरात यांना ८१.१७ तसेच नीलम एकनाथ भोसले बारावी कॉमर्स यांनी ६४.५० तसेच वरद मनोहर ढवळे सम्यक सचिन अब्दुले सिद्धार्थ सचिन कांबळे या विद्यार्थ्यांनीही बारावी मध्ये घवघवीत यश संपादन केल्याबद्दल सर्व विद्यार्थ्यांचे भारतीय बौद्ध महासभा शाखा करमाळा यांच्या वतीने पेन फुल पुस्तक देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. बुद्ध जयंती मध्ये ज्यांनी आपल्या कलागुणांना वाव देऊन लेझीम व टिपऱ्यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले व ज्यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले असेच आयुष्यमान रमेश भारत कांबळे यांचाही सत्कार करण्यात आला

प्रमुख चौका चौकामध्ये बुद्ध जयंतीच्या दिवशी डबल काठी फिरवून ज्यांनी प्रात्यक्षिक केलं ते दिलीप चाचा यांचे नातू व भीमराव उर्फ फकीरा यांचे चिरंजीव रामजी भीमराव कांबळे या बालकलाकारांचाही सत्कार भारतीय बौद्ध महासभा शाखा करमाळा यांच्या वतीने करण्यात आला. जनतेचे नगरसेवक जयकुमार कांबळे तसेच करमाळा नगरपरिषद नगरसेविका सविता जयकुमार कांबळे यांची कन्या संस्कृती जयकुमार कांबळे यांनी प्रत्येक चौकामध्ये तलवारबाजी व डबलकाठीचे प्रात्यक्षिक करून बुद्ध जयंती ची शोभा वाढवली म्हणून त्यांचाही सन्मान या वेळी करण्यात आला.यावेळी विलास ओहोळ सर एकनाथ भोसले ज्योती भोसले प्राध्यापिका सुवर्णा कसबे सचिन चव्हाण अर्चना चव्हाण किसन गुरुजी साहेब महाराजा कांबळे प्रमोद गायकवाड रमेश भरत कांबळे दिलीप चाचा सरचिटणीस भीमराव कांबळे सर आदी मान्यवर उपस्थित होते हा सर्व कार्यक्रम भारतीय बौद्ध महासभा तालुका अध्यक्ष केंद्रीय शिक्षक बौद्धाचार्य प्रशांत कांबळे यांच्या उपस्थितीत घेण्यात आला

# डुबेरे जनता विद्यालयाने राखली कायम उज्वल यशाची परंपरा

## विद्यालयाचा दहावीचा निकाल ९४.५५ टक्के

**सिन्नर/दैनिक यशसिध्दि न्यूज**




सिन्नर तालुक्यातील डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा इयत्ता दहावीचा निकाल ९४ .५५ टक्के इतका लागला असून विद्यालयाने उज्वल यशाची परंपरा या वर्षीही कायम राखल्याने सर्वत्र समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

मार्च -२०२४ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालांत परीक्षा मध्ये विद्यालयातील दर्शन कैलास माळी (९१.६०) प्रथम, समृध्दी रावसाहेब वाजे(९१.४०) व कल्याणी सुनील मुजगुडे (९१.४०) यांनी द्वितीय,ओम नामदेव माळी (८९.६०) तृतीय, समृध्दी मच्छिंद्र कडभाने (८९) व अंकुश विलास कडभाने (८९) यांनी चतुर्थ, सिध्दी रामदास वाडेकर (८८.८०) हिने पाचवा क्रमांक मिळवत यश संपादन केले.

विद्यालयातील १४७ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले होते .त्यापैकी १३९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. ६६ विद्यार्थ्यांनी विशेष प्रावीण्य तर ५७ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी मिळविली.१५ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले. यशस्वी विद्यार्थ्यांना डी. एच.जाधव ,सोमनाथ गिरी, पी.आर. करपे,सोमनाथ पगार अरुण डावरे, राजेंद्र गांगुर्डे, सीमा गोसावी,मारुती डगळे, डी.ए.रबडे,रेवणनाथ कांगणे,सोमनाथ बोडके आदींचे मार्गदर्शन लाभले.यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शन करणारे शिक्षक यांचे मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सरचिटणीस अँडव्होकेट नितीन ठाकरे, तालुका संचालक कृष्णाजी भगत , संस्थेचे शिक्षणाधिकारी डॉ.भास्करराव ढोके, शालेय समितीचे अध्यक्ष नारायणशेठ वाजे ,उच्च माध्यमिक समितीचे अध्यक्ष विठ्ठलतात्या वामने, प्राचार्य दिगंबर पठारे , पर्यवेक्षक रामदास वाजे आदींसह शालेय समितीचे सदस्य, पालक शिक्षक संघ सदस्य, शिक्षक ,शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

# कल्याण ग्रामीण दहीवली येथील सोमनाथ राऊत यांना दिल्लीत नवरत्न पुरस्काराने सन्मानित

**उल्हासनगर/बाळासाहेब अहिरे**




कल्याण तालुक्यातील दहिवली गावातील सोमनाथ राऊत ह्यांच्या कार्याची दखल दिल्ली येथील नवरत्न फाउंडेशनने घेऊन प्रोग्राम समर्पण २०२४ मध्ये त्यांना नवरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. त्यात पुरस्काराचे स्वरूप म्हणून अकरा हजार रुपयांची रोख रक्कम देण्यात आली आहे. सदर हा कार्यक्रम दिल्लीत नोएडा इंदिरा गांधी कला केंद्र येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी भारतातील ७ नागरिकांना सन्मानित करण्यात आले. युवा संस्कार बहुउद्देशीय संस्थेच्या माध्यमातून कल्याण तालुक्यात आदिवासी भागात सामाजिक ,शैक्षणिक ,सांस्कृतिक उपक्रम स्वखर्चातून राबवून विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवत असतात. म्हणून त्यांच्या कार्याची दखल घेऊन.दिल्ली येथील नवरत्न फाउंडेशनच्या वतीने प्रोग्राम समर्पण २०२४ मध्ये नवरत्न फाऊंडेशनचे अध्यक्ष अशोक श्रीवास्तव यांच्या हस्ते युवा संस्कार बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष सोमनाथ राऊत यांना नवरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्वच स्तरातून युवा संस्कार बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष सोमनाथ राऊत यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून त्यांचे कौतुक केले जात आहे.

# नळदुर्ग जिल्हा परिषद कन्या प्रशालेचा निकाल ९४.७३% निकाल

## प्रबोधिनी दादासाहेब बनसोडे शाळेत पाहिली तर अनुष्का शिवाजी गायकवाड द्वितीय करिष्मा सतिश चव्हाण तिसरी




नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे SSC इयत्ता १० वी बोर्डाचा निकाल जाहीर झाला असून जिल्हा परिषद कन्या प्रशाला नळदुर्ग या शाळेचा निकाल ९४ . ७३% लागला आसुन यामध्ये प्रबोधिनी दादासाहेब बनसोडे यांनी ८८% मार्क घेऊन शाळेत प्रथम येण्याचा मान मिळवला तर अनुष्का शिवाजी गायकवाड यांनी ८७. ८०% दुसरा मान मिळविला तर करिष्मा सतीश चव्हाण हिला ८६ .४० % टक्के मार्क घेऊन तिसरा क्रमांक पटकाविला एकुण १९ मुली शिक्षण घेत होत्या त्या पैकी उतिर्ण झाल्या आहेत त्यापैकी प्राविण्या मध्ये एकुण ७ मुली आसुन प्रथमश्रेणी ५ तर द्वितीय श्रेणी मध्ये ६ विद्यार्थी आहेत या सर्व उतिर्ण विद्यार्थीनीचे अभिनंदन व कौतुक होत आहे . यामध्ये शाळेचे मुख्याध्यापक कमलाकर गायकवाड , सहशिक्षक सत्तेश्र्वर जाधव , मिलींद कुलकर्णी , माजी मुख्याध्यापक बसवंत गायकवाड निर्मला गावीत , दत्तात्रय सगर , लीलावती कौरव , हरुण अत्तार अश्रि्वनी साळुंखे , आदींचे मार्गदर्शन लाभले सर्व विद्यार्थांचे अभिनंदन व कौतुक होत आहे

# नंगपूरा-मुर्री निवासी शाळेतून निलेश बडोले प्रथम तर यश भोयर द्वितीय

शंभर टक्के निकालाची परंपरा कायम

**गोदिंया/दैनिक यशसिध्दि न्यूज :**




शहराला लागून असणारी अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा नंगपूरा-मुर्री येथील वर्ग दहावीचे माध्यमिक शालान्त परिक्षेत सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहे. यामध्ये बारा विद्यार्थी प्राविण्य प्राप्त असून तेरा प्रथम श्रेणीत आले.

यावेळी शाळेतून निलेश राजकुमार बडोले ८४.०० टक्के घेऊन प्रथम आला तर यश भोयर याने ८३.४० घेऊन द्वितीय आला, तृतीय प्रफुल्ल नंदेश्र्वर ८२.४० तर धम्मदिप राऊत ८२.४० यांनी मिळविला आहे.

माध्यमिक शालान्त परिक्षा मार्च २०२४ परिक्षेत सर्व विद्यार्थी पास होऊन शाळेचा शंभर टक्के लागलेला आहे. याप्रसंगी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, समाज कल्याण सहाय्यक आयुक्त विनोद मोहतुरे यांनी भ्रमणध्वनी वरुन अभिनंदन केले. शाळेत सर्व विद्यार्थी उत्तीर्ण होऊन शंभर टक्के निकाल जाहीर झाल्याबद्दल आनंद व्यक्त करताना मुख्याध्यापक रविशंकर इठूले, नीता भलमे, प्रदीप ढवळे, साधना पारधी, मुन्नाभाई नंदागवळी, तुषार महाजन आदी उपस्थित होते.

# हन्नूरच्या अनंत चैतन्य प्रशालेचा इयत्ता दहावीचा निकाल लागला १००%

अक्कलकोट/प्रतिनिधीः महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे विभागाच्यावतीने मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेचा महर्षि विवेकानंद समाजकल्याण


कु. सानिका इरण्णा मंगरुळे (८८% गुण प्रथम क्रमांक)


कु. मुनजा खमरअली पिरजादे (८७.२० टक्के गुण. द्वितीय क्रमांक)


कु. शिरीन अल्लियोद्दीन पिरजादे ( ८७% गुण. तृतीय क्रमांक.)

संस्था, अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेचा निकाल १००ङ्ख टक्के लागला.या परीक्षेसाठी एकुण ५७ विद्यार्थी- विद्यार्थिनी प्रविष्ट झाले होते व मागील वर्षीच्या यशाची परंपरा कायम राखत सर्वच्या सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून यातील १८ विद्यार्थी विशेष श्रेणीने, २७ विद्यार्थी प्रथम श्रेणीत तर ११ विद्यार्थी हे द्वितीय श्रेणीने उत्तीर्ण झाले आहेत फक्त एक विद्यार्थी हा पास ग्रेड ने उत्तीर्ण झाला आहे. यातील कु. सानिका इरण्णा मंगरुळे हिने ८८ङ्ख टक्के गुण प्राप्त करून प्रशालेतून प्रथम येण्याचा मान पटकावला आहे तर कु. मुनजा खमरअली पिरजादे ही ८७.२०टक्के गुण मिळवून द्वितीय तर कु. शिरीन अलियोद्दीन पिरजादे हिने ८७ टक्के गुण प्राप्त करून प्रशालेतून तृतीय क्रमांक प्राप्त केली आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षक व शिक्षिका यांचे संस्थेचे अध्यक्ष तथा आमदार मा. सचिनदादा कल्याणशेट्टी, संस्थेचे जेष्ठ संचालक व मार्गदर्शक आदरणीय श्री. मल्लिनाथ कल्याणशेट्टी, प्रशालेचे माजी प्राचार्य व आधारवड सन्माननिय श्री. सिद्धेश्वर कल्याणशेट्टी, संस्थेच्या संचालिका सौ. शांभवीताई कल्याणशेट्टी, हन्नूरचे उपसरपंच व युवा नेते मा. श्री. सागरदादा कल्याणशेट्टी, संचालक मा. श्री. मल्लिकार्जुन मसुती, संस्थेच्या शिक्षण विभाग प्रमुख सौ. रुपाली शहा मॅडम, विज्ञान विभागाच्या प्रमुख सौ. पुनम कोकळगी मॅडम, सौ. सुरेखा कल्याणशेट्टी माध्य.व उच्च माध्यमिक प्रशालेचे प्राचार्य श्री. मलकप्पा भरमशेट्टी, प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. विलास बिराजदार ,पर्यवेक्षक श्री. अशोक साखरे, वर्गशिक्षक श्री. ज्ञानदेव शिंदे यांनी अभिनंदन केले.

बारावी पाठोपाठ प्रशालेचा दहावीचा निकाल ही १००ङ्ख लागल्याने हन्नूर परिसरातील पालकांमध्ये व नागरिकांत आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# कल्याणशेट्टी कनिष्ठ महाविद्यालयाचा १२ वी परीक्षेत घवघवीत यश



अक्कलकोट /प्रतिनिधी : सौ.सुरेखा कल्याणशेट्टी उच्च माध्यमिक विद्यालयाचा फेब्रुवारी २०२४ मध्ये झालेल्या बोर्ड परीक्षेस एकूण १६२ विद्यार्थी बसले होते. पैकी वाणिज्य विभागाचे ३८ पैकी ३८ उत्तीर्ण होऊन १००% निकाल लागला आहे. तर सायन्स विभागाचे ७९ पैकी ७८ विद्यार्थी उत्तीर्ण असून ९८.७३ % निकाल लागला आहे. कला शाखेचे ४५ पैकी ४४ उत्तीर्ण झाले असून ९७.७७ % निकाल लागला आहे. एकूणच महाविद्यालयाचा निकाल ९८.८३ % इतका लागला असून गुणवत्तेची परंपरा कायम ठेवली आहे.

सायन्स विभागात कु. जयश्री साठे ही प्रथम आली असून तीला ८६%, द्वितीय कु. गायत्री बंदिछोडे ही ८५%, तृतीय अकमल सुलतान हा ८४ % गुण घेतला आहे.

वाणिज्य विभागात कु.प्रिती तेली ही ८७.१७% गुण घेऊन प्रथम आली आहे., कु.मुस्कान शेख ही ८०.३३ % गुण मिळवून द्वितीय आली, तर कु.शबाना शेख ही ७९.६७% गुण मिळवून तृतीय आली आहे.

कला शाखेत कु.अंजली कांबळे ही ८२.३३% गुण घेऊन महाविद्यालयात प्रथम, कु.सानिया शेख ही ८१.५०% गुण मिळवून द्वितीय आली, तर अरफाज शेख हा ७८.१७% गुण मिळवून वर्गात तृतीय आला आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष तथा आमदार सचिन कल्याणशेट्टी यानी अभिनंदन केले आहे. सलग तीन वर्षे महाविद्यालयाचा १००% निकाल लागत असल्यामुळे या महाविद्यालयात प्रवेशासाठी गर्दी वाढत आहे.

निकालानंतर यशस्वी विद्यार्थ्यांचा संचालक मल्लीनाथ कल्याणशेट्टी, संचालिका शांभवी कल्याणशेट्टी, संचालक मल्लिकार्जुन मसुती, कनिष्ठ महाविद्यालय प्रमुख पूनम कोकळगी, सेमी विभाग प्रमुख रूपाली शहा, प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी यांच्या हस्ते सत्कार करून पेढा वाटप करण्यात आला. यावेळी उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक सर्व शिक्षकांचे अभिनंदन करण्यात आले. सूत्रसंचलन प्रा गुरूशांत हपाळे यानी केले.

# निराधारांना शासनाचा आधार; आता डिबीटी मार्फत मिळणार लाभार्थांना थेट अनुदान

## संजय गांधी व श्रावणबाळ योजनेच्या लाभार्थ्यांनी तलाठी कार्यालयात कागदपत्रे सादर करा

**नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे**

शासनाकडून निराधार व्यक्तींना योजनेच्या माध्यमातून महिन्या काठी ठराविक मानधन दिले जात होते हे मानधन लाभार्थ्यांना तहसील कार्यालयातून दिले जात होते मात्र आता शासनाची योजना निराधारांना शासनाचा आधार म्हणून थेट डीबीटी मार्फत निराधार लाभार्थ्यांना अनुदान वर्ग होणार आहे. संजय गांधी निराधार व श्रावण बाळ योजनेच्या लाभासाठी यापूर्वी तहसील कार्यालयाकडून संबंधित बँकेत सर्व लाभार्थ्यांची यादी पाठवून दिल्यानंतर सर्व लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळत होता आणि त्यानंतर निधी लाभार्थ्यांच्या खात्यात वर्ग केला जात होता या प्रक्रियेस खूप



**ही द्यावी लागणार कागजपत्रे**
**१) हयात आसलेले प्रमाणपत्र**
**२) आधारकार्ड ,**
**३) बँकेचे पासबुक**
**४) बँकेत लिंक आसलेला मोबाईल नंबर**

मोठा विलंब होत होता त्यामुळे वयोवृद्ध अपंग , मुकबधीर लाभार्थी बँकांत खेटे घालावे लागत होते .

आता निराधारचे अनुदान थेट डिबीटी मार्फत लाभार्थ्यांच्या खात्यात वर्ग होणार आहे या योजेने मुळे निराधारांची हेळसांड थांबणार आहे

बँक कर्मचाऱ्यांची कसरत थांबणार आहे त्यामुळे दोन्ही योजनांचा लाभ घेत असलेल्या निराधारा कडून आधार कार्ड आणि मोबाईल क्रमांक संकलित करण्याची प्रक्रिया तुळजापूर तहसील विभागाकडून सुरू करण्यात येत आहे याबाबत गाव स्तरावर तलाठ्यांना आवश्यक त्या सूचना देऊन संबंधित लाभार्थ्यांनी आपले सर्व कागदपत्रे तलाठी कार्यालयामध्ये सादर करण्याचे आवाहन तुळजापूरचे तहसीलदार अरविंद बोळंबे , नायब तहसीलदार मोहन पांचाळ यांनी केले आहे .संजय गांधी निराधार श्रावणबाळ निवृत्तीवेतन योजनेचा लाभ घेत असलेल्या लाभार्थ्याने ३० मे पर्यंत आधार कार्ड मोबाईल नंबर तलाठी कार्यालय जमा करावे एक ही लाभार्थी या योजनेपासून वंचित राहू नये यासाठी शासनाचे प्रयत्न चालू आहे वरिल कागजपत्र तात्काळ तलाठी कार्यालयात जमा करावी जे लाभार्थी आपल कागज पत्र सादर करणार नाहीत त्यांचे अनुदान बंद होणार तरी सर्व लाभार्थीनी तात्काळ आपली कागजपत्रे तलाठी कार्यालयात सादर करावे आसे अवहान तुळजापूरचे तहसिलदार अरविंद बोळंगे व नायब तहसीलदार मोहन पांचाळ महसुल सहाय्यक राहुल वाघमारे अमित सोनवणे यांनी केले आहे .

# कल्याणशेट्टी विद्यालयाचा १० वी परीक्षेत घवघवीत यश

प्रथम क्रमांक ९२.८०%

कु.प्रतिभा सोलनकर

द्वितीय क्रमांक ९२.६०%

कु.स्फूर्ती खराडे

तृतीय क्रमांक ९१.६०%

कु.लक्ष्मी चिकमळी

**अक्कलकोट/प्रतिनिधी :**

सौ.सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक विद्यालयाचा मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या बोर्ड परीक्षेस एकूण ७८ विद्यार्थी बसले होते. पैकी ७७ उत्तीर्ण होऊन ९८.७१% निकाल लागला आहे. यात ९०% पेक्षा जास्त ६ विद्यार्थी असून ७५ % पेक्षा जास्त ३७ विद्यार्थी आहेत. कु. प्रतिक्षा सोलनकर ही ९२.८०% गुण मिळवून प्रशालेत प्रथम आली आहे. कु.स्फूर्ती खराडे ही ९२.६०% गुण मिळवून द्वितीय आली, तर कु.लक्ष्मी चिकमळी ही ९१.६०% मिळवून प्रशालेत तिसरी आली आहे. यावर्षीही गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष तथा आमदार सचिन कल्याणशेट्टी यानी अभिनंदन केले आहे. निकालानंतर यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक सर्व शिक्षकांचे संचालक मल्लीनाथ कल्याणशेट्टी, संचालिका शांभवी कल्याणशेट्टी, संचालक मल्लिकार्जुन मसुती, कनिष्ठ महाविद्यालय प्रमुख पूनम कोकळगी, सेमी विभाग प्रमुख रूपाली शहा, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी यांनी अभिनंदन केले आहे.

# श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती संगमनेर येथील भाविकांकडून ५१ ०००/हजार रुपयांची देणगी

**पंढरपूर/प्रतिनिधी**

पंढरपूर दिनांक २७ /५/ २०२४ रोजी माधव नामदेव शहाणे मुक्काम पोस्ट गोंधळवाडी यांच्याकडून श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती ५१ हजार रुपये ची देणगी दिली आहे त्याबद्दल त्यांचा सत्कार लिपिक श्री योगेश रमेश काढणे यांच्या शुभहस्ते श्री ची प्रतिमा व उपरणे देऊन येतोच सन्मान



करण्यात आला त्यावेळी इतर कर्मचारी उपस्थित होते

# डॉ आंबेडकर इंग्लिश मिडीयम स्कूल नळदुर्गचा निकाल शंभर टक्के : सर्व विद्यार्थी मेरीट मध्ये उत्तिर्ण

**नळदुर्ग/एस.के.गायकवाड**

सम्यक सेवाभावी संस्था नळदुर्ग ता.तुळजापूर संचलित डॉ.आंबेडकर इंटर नॅशनल इंग्लिश मिडीयम स्कूल नळदुर्गचा इ.१० वि चा निकाल शंभर टक्के लागला असून या शाळेची विद्यार्थिनी कुमारी श्रध्दा संजय चिमणे यांनी ९८ टक्के गुण घेऊन शाळेतच नव्हे तर नळदुर्ग केंद्रात प्रथम क्रमांक पटकावला असून सर्वच विद्यार्थ्यी मेरीट मध्ये उत्तिर्ण होऊन शाळेचे नाव लौकीक केले आहेत.

दि.२७ मे रोजी मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या

इ.१० बोर्ड परिक्षेचा निकाल जाहीर झाला असून नळदुर्ग येथील डॉ आंबेडकर इंटर नॅशनल इंग्लिश मिडीयम स्कूल चा निकाल शंभर टक्के लागला आहे.या शाळेतून एकूण २४ विद्यार्थी या परीक्षेला बसले होते.




२४ पैकी २४ विद्यार्थी मेरीट चे गुण मिळवून उत्तीर्ण झालेले असून याच शाळेतील विद्यार्थ्यांनी कुमारी श्रध्दा संजय चिमणे यांनी ९८ टक्के गुण घेऊन नळदुर्ग केंद्रात प्रथम क्रमांक पटकावला आहे.

या शाळेतील सर्व विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत असून शाळेचे संस्थापक अध्यक्ष मारुती खारवे यानी शाळेचे मुख्याध्यापक शिक्षक आणि उत्तिर्ण विद्यार्थी यांचे अभिनंदन केले आहे.

# कौठाळी ग्रामपंचायतीच्या सरपंच पदी सुरेखा गोडसे यांची निवड



**पंढरपूर/प्रतिनिधी :**

पंढरपूर तालुक्यातील कौठाळी ग्रामपंचायतीच्या सरपंच पदी सुरेखा रघुनाथ गोडसे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. निवडीच्या वेळी सरपंच पदासाठी गोडसे यांचा एकमेव अर्ज आल्यामुळे निवडणूक निर्णय अधिकारी दिनेश भडंगे यांनी निवडणूक बिनविरोध झाल्याचे जाहीर केले. निवडीनंतर माजी आमदार प्रशांतराव परिचारक, प्रणव परिचारक यांनी नूतन सरपंच सुरेखा गोडसे यांचा सत्कार केला.

यावेळी सोसायटीचे माजी अध्यक्ष ईश्र्वरा धुमाळ, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक आरूण नागटिळक, ह.भ.प.प्रभाकर इंगळे, माजी सरपंच मोहन नागटिळक, महादेव गाढवे, शंकर गोडसे, अनिल नागटिळक, वसंत नागटिळक, उपसरपंच धोंडीराम वाघमोडे, रामदास नागटिळक,अनिल महादेव नागटिळक, बाळासाहेब धुमाळ, मोहन पाटील , विठ्ठल पाटील विकास नागटिळक,शिवाजी नागटिळक, संदीप पाटील, दिलीप इंगळे, नाना गाढवे, रघुनाथ गोडसे,बाळू ईनामदार, रामेश्र्वर भारती, सचिन आटकळे, विलास पाटील, दशरथ गाढवे, तुकाराम चव्हाण, अरुण धुमाळ, शिवाजी धुमाळ, वैभव धुमाळ,गोरख गोडसे,हरी गोडसे, जहाँगीर इनामदार, यांच्यासह बहुसंख्य मान्यवर उपस्थित होते.

# उजनी ज्वेलर्सच्यावतीने आयोजित कुस्ती स्पर्धा उत्साहात संपन्न

भिगवण/प्रतिनीधी : उजनी ज्वेलर्सच्या वतीने तक्रारवाडी (ता. इंदापूर) येथे माजी राज्यमंत्री तालुक्याचे लाडके आमदार दत्तात्रय भरणे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने निकाली कुस्त्यांचे जंगी मैदान आयोजित करण्यात आले होते. यावेळी मैदानामध्ये अनेक प्रेक्षणीय कुस्त्या प्रेक्षकांना पाहायला मिळाल्या.उजनी ज्वेलर्सचे संस्थापक तक्रारवाडी ग्रामपंचायतीचे माजी सरपंच अनिल काळंगे,कार्तिक काळंगे ,किशोर काळंगे यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी पै . सुदर्शन कोतकर विरुद्ध गणेश कुंकुले,मनीष रायते विरुद्ध प्रसाद सस्ते,नामदेव कोकाटे विरुद्ध सुमित मरगजे, पृथ्वीराज खडके विरुद्ध लखन माने,प्रतीक कदम विरुद्ध संतोष पडळकर अशा लढती प्रेक्षणीय झाल्या.

यावेळी आमदार दत्तात्रय मामा भरणे यांनी उपस्थित राहून आयोजकांचे कौतुक केले.यावेळी त्यांच्यासमवेत पुणे जिल्हा परिषदेचे माजी सदस्य प्रताप पाटील, श्रीमंत ढोले, अण्णासाहेब आढाव, जिल्हा नियोजन समितीचे माजी सदस्य सचिन सपकळ, अशोक चोरमले,तुकाराम बंडगर, आबासाहेब देवकाते,संपत बंडगर, सरपंच तुषार क्षिरसागर,प्रशांत वाघ,नानासाहेब बंडगर, इंजी.नानासाहेब बंडगर,मोहन वाघ,सतीश वाघ,जनार्दन सुतार,तुळशीराम खारतोडे,विजय जगताप,सचिन वाघ आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी फेटे बांधून उपस्थित सर्वांचा सन्मान उजनी ज्वेलर्सच्या वतीने अनिल काळंगे,कार्तिक काळंगे यांच्यावतीने करण्यात आला. कुस्ती स्पर्धेच्या नियोजनासाठी वस्ताद गोपाळ वाबळे यांचे विशेष सहकार्य लाभले.कुस्ती स्पर्धेचे निवेदन प्रशांत भागवत यांनी केले

तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीपक वाघ,महादेव बंडगर यांनी केले.यावेळी परिसरातील विविध गावातून मोठ्या संख्येने कुस्तिशौकिन आवर्जून उपस्थित होते.आयोजकांच्या वतीने स्पर्धेचे अतिशय सुंदर नियोजन करण्यात आले होते याचे उपस्थितांनी यावेळी कौतुक केले.